**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 30 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Jan. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# Index

1. Digital Banking :An Overview 5
Dr Madhukar P Aghav
2. Financial Markets : Evaluating Averages and Indicators 11
Dr Sachin Nagnath Hadoltikar
Memon Sohel Mohd Yusuf
3. Human Resource Management (Hrm) :An Overview 16
Dr. Kathar Ganesh. N.
4. Impact of Mergers & Acquisition on Private Sector Banks In Global Economy 21
Dr. Nanaji Krishna Aher
5. Dramatic Stress: The Spirit of Play 26
Sheema Farheen
Dr Farhat Durrani
6. Recent Trend InBanking 33
Swapnil .Kalyan. Laghane, Dr Quazi Baseer Ahmed
7. Corporate Governance in Maharashtra Companies 39
Dr. Rajesh Bhausaheb Lahane
8. Effective Digital Marketing Strategies & Approaches 46
Dr Vikrant Uttamrao Panchal
9. Global Competitiveness of Indian Industries Strategy and Innovation 54
Dr. Rajendra Ashokrao Udhan
10. Indian logistics Trade in Dynamic World Scenario 60
Adnan Ali Zaidi, Dr Memon Ubed
11. Demonetization: Before And After Menkudle D.V 72
Dr. Shahuraj S. Mule
12. Status and Occupational Prospects of Outcome SC and St research scholar of Hyderabad Karnataka Universities 76
Dr. Shashikant Shankar Singe
13. Political aspects of Islam 82
Harshvardhan Sandipan Kolhapure
14. मानवधिकार और नारी शोषण 85
डॉ. शेषराव लिंबाजी राठोड
15. नई बिसात : उपन्यास में दलित चित्रांकण 88
डॉ. बालाजी कोनाळे
16. उत्तरशती की हिंदी कहानियों मे नारी शोषण 91
प्रा.इंगळे अमोल रमेश
17. पारधी जमातीच्या स्त्रियांच्या समस्या : आव्हाने आणि उपाय 96
प्रा. राठोड ईश्वर लक्ष्मण

Scanned by CamScanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 30 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Jan. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# पारधी जमातीच्या स्त्रियांच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

**प्रा. राठोड ईश्वर लक्ष्मण**
समाजशास्त्र विभागप्रमुख, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना :**

ब्रिटिश काळापासून ते आजच्या आधुनिक भारतात देखील अनेक आदिवासी जमाती विकासाच्या प्रक्रियेपासून अत्यंत दुर असल्याचे दिसून येते. यामध्ये ही स्त्री विकासाच्या केंद्रस्थानी येवू शकली आणि त्यांना त्या समाजातून व इतर उच्चभ्रु जाती कडून ही ती संधी देण्यात आली नाही. म्हणून आजही अनेक आदिवासी जमातीच्या स्त्रियांच्या समस्या फार मोठया प्रमाणात आहेत. त्या स्त्रियांसमोर अनेक आव्हाने देखील असल्याचे दिसून येते. पारधी जमातीच्या स्त्रियांचे देखील अनेक प्रश्न आणि त्यांच्या समोर अनेक आव्हाने उभे आहेत, तरी देखील त्यांना समाजात आणि समाजाबाहेर देखील पाहिजे तशी वागणूक दिली जात नाही, म्हणून पारधी जमातीच्या महिलांचे सक्षमीकरण करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

स्त्री शिक्षणाबाबत ब्रिटिश सरकारने हेतूतः केलेले दुर्लक्ष व स्त्री शिक्षणाला ब्राह्मणी वृत्तीच्या पुढाऱ्यांनी केलेला विरोध यामुळे स्त्रीशिक्षणाचा विकास अतिशय संथ गतीने झाला. स्वातंत्र्यपूर्व काळातील सुधारणावादी चळवळीमध्ये स्त्री प्रश्न हा मध्यवर्ती होता. जातिव्यवस्था व पितृसत्तेच्या संवर्धनात स्त्रियांची भूमिका महत्त्वाची असल्यामुळे ब्रिटिशांच्या अनुशंगाने जी आधुनिकता भारतात आली होती. तिचा कमीत कमी प्रभाव स्त्रियांवर व्हावा यासाठी उच्चजातीय पुरूष प्रयत्नशील होते. सुरूवातीला स्त्री शिक्षणाच्या संकल्पनेलाच विरोध व पुढे स्त्री शिक्षण अपरिहार्य बनल्यानंतर स्त्री शिक्षणाच्या आशयाबाबत पुरूषसत्ताक दृष्टिकोन बाळगून ब्रिटिश सरकारशी बोलणी करण्याची भूमिका या वर्गाने घेतली. शिक्षणापासून वंचित ठेवून स्त्रियांचे शोषण करण्याची मानसिकता पारंपारिक ते आधुनिक समाजात देखील दिसून येते. अनेक आदिवासी जमातीतील महिलांना शिक्षण न दिल्यामुळे या निरक्षर महिलांचे कायमच शोषण होत राहिले. नंतरच्या काळात त्या समाजातून ही स्त्रियांना कोणत्याही प्रकारची संधी अथवा परिवर्तन घडवून आणण्यासाठी कोणतेही ठोस कार्यक्रम राबविले गेले नाहीत. म्हणून आज देखील पारधी आदिवासी जमातीसारख्या अनेक जाती-जमातीच्या स्त्रियांच्या सामाजिक समस्या व त्यांच्या समोर अनेक आव्हाने असल्याचे स्पष्ट दिसून येते.

कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या स्त्रियांचे आजच्या २१ व्या शतकात देखील अनेक समस्या आणि आव्हाने असल्याचे दिसून येत आहेत. परंतु आज कोणत्याही स्तरातून या जमातीच्या महिलांसाठी खास असे शासन व सरकारच्या माध्यमातून उपक्रम राबवून परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात नाही. म्हणून आजही या जमातीच्या महिलांच्या अनेक सामाजिक समस्या व आव्हाने असल्याचे दिसून येते. या संशोधनात्मक लेखाच्या आधारे कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या महिलांचे प्रश्न व आव्हाने अभ्यासले जाणार असून यावर जमातीच्या परिवर्तनासाठी काय करणे गरजेचे आहे, या संदर्भात सुचना व निष्कर्षाच्या माध्यमातून ठळक बाबी नोंदविल्या जाणार आहे.

**संशोधनाची उदिष्टये :**

१. पारधी जमातीच्या स्त्रियांच्या समस्या समजून घेणे.
२. पारधी जमातीच्या स्त्रियांवरील असलेले निर्बंध स्पष्ट करणे.
३. पारधी जमातीच्या स्त्रियांपुढील आव्हाने जाणून घेणे.

**संशोधन पध्दती :**

पारधी आदिवासी जमातीच्या स्त्रियांच्या समस्या, आव्हाने या अनुषंगाने प्रस्तुत शोध निबंध लिहिला जाणार आहे. या शोध निबंधात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करून शोध निबंध मांडले जाणार आहे. या शोध निबंधामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून मुलाखत अनुसूची या तंत्राच्या सहाय्याने माहिती गोळा करण्यात आलेली आहे.



Scanned by CamScanner

संशोधन विषय कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या संदर्भात असल्यामुळे प्रत्यक्ष कळंब तालुक्यातील १० पारधी वस्तीला भेटी देवून हा अभ्यास करण्यात आलेला आहे. यामध्ये पारधी जमातीच्या महिलांचे सामाजिक समस्यांचा व त्यांच्या पुढील आव्हाने या बाबीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. दुय्यम स्त्रोत म्हणून प्रकाशित-अप्रकाशित साहित्य, संदर्भग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**पारधी जमातीच्या स्त्रियांच्या समस्या :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील पारधी जमातीचा अभ्यास करीत असतांना प्रत्यक्ष केलेल्या पाहणीवरून असे म्हणता येईल की, आजही या जमातीच्या स्त्रियांच्या अनेक समस्या असून त्या स्त्रिया कायमस्वरूपी संघर्ष करीत आलेल्या आहेत. उस्मानाबाद जिल्हयात गाव पारधी लोकांच्या अनेक ठिकाणी वस्ती असून कोणत्याही वस्तीला भेटी दिल्यास असेच दिसून येईल की, त्यांना आजही स्वतःचे राहण्यासाठी घर नाही, असेल तेही स्वतःच्या शेतीत, गावाशेजारी असलेल्या पडीक जागेवर, शासनाच्या जागेवर परंतु अनधिकृतपणे पत्र्यांचे बांधलेले घरे असतील, अशा स्वरूपाची त्यांची घरे आपणास दिसून येतात. या जमातीच्या महिलांच्या अनेक सामाजिक समस्या असल्याचे अभ्यासावरून लक्षात येते.

हुंडा पध्दतीला गाव पारधी समाजात मान्यता असून या जमातीत हुंडा पध्दतीचा स्विकार करून लग्न कार्य पार पाडण्याची प्रथा आजही दिसून येते. परंतु हुंडा प्रथा ही अनिष्ठ असल्याचे त्यांना या संदर्भात माहिती नाही. हुंडा वेगवेगळया स्वरूपातून दिल्या जाते, असे मुलाखतीच्या दरम्यान निवेदकांनी माहिती दिली. परंतु यामुळे अत्यंत गरीब व आर्थिकदृष्टया मागास असलेल्या कुटुंबाला हे शक्य होत नसल्यास त्यांनी कोणत्या पध्दतीने लग्न करावे हा त्यांच्या पुढील फार मोठा प्रश्न असल्याचे दिसून येते.

आदिवासी पारधी जमातीत व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे या जमातीत महिलांना कौटुंबिक हिंसाचाराला देखील सामोरे जावे लागत असते. कारण की, या जमातीत बाल विवाह मोठया प्रमाणात होत असल्यामुळे अनेक मुले आपल्या आई-वडिलांपासून वेगळे राहतात व ते व्यसनाधिन बनतात. यामुळे त्या कुटुंबातील स्त्रियांची पुरूषाकडून सामाजिक कुचंबना केली जाते, तसेच नषेत असताना कुटुंबात काही शुल्लक कारणावरून देखील भांडण होतात. काही कुटुंबातील स्त्रिया देखील व्यसन करीत असल्याचे दिसून येते. कारण की, आजही प्रत्येक कुटुंबात वयोवृध्द माणसे असल्यामुळे ते लोक व्यसन नियमितपणे करीत असतात. या आणि अशा अनेक कारणांमुळे या जमातीतील महिलांच्या समस्या वाढत चाललेल्या दिसून येतात.

शैक्षणिकदृष्टया आजही पारधी जमातीतील महिलांना परिपूर्ण होवू दिले जात नाही. तसेच त्या समाजाची मानसिकता देखील त्या स्वरूपाची असल्याचे दिसून येते. महिलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जात नाही, किंवा ज्या काही मुली शिक्षण घेत आहेत, त्यांना देखील पुढे शिक्षण घेण्यासाठी कुटुंब आणि समाज विरोध करीत असल्याचे दिसून येते. म्हणून या जमातीतील पुरूषसत्ताक व्यवस्थेची मानसिकता बदलणे गरजेचे असल्याचे वाटते. पारधी समाजातील लोक समुदायात फार मोठया प्रमाणात जनजागृती झाली तर निश्चितच परिवर्तन झाल्याशिवाय राहनार नाही. म्हणून तसे कार्य घडून येणे गरजेचे आहे.

**पारधी जमातीच्या स्त्रियांवर असलेले निर्बंध :**

भारतीय समाजव्यवस्थेत पारंपारिक ते आजच्या आधुनिक युगात देखील पारधी आदिवासी स्त्रियांच्या शोषणाची प्रक्रिया बंद झालेली नाही. याउलट आजही या जमातीच्या स्त्रियांचे शोषण होत असल्याचे दिसून येतात. आदिवासी स्त्री-पुरूषांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय लूटमार करून त्यांना देशोधडीला लावण्याचे उद्योग सर्रास सुरू आहेत, त्यामध्ये त्यांचा पहिला बळी म्हणजे आदिवासी स्त्री आहे, असेच म्हणावे लागेल.

मतृसत्ताक व्यवस्थेच्या पाईक असलेल्या आदिवासी स्त्रिया आज मात्र विपन्न अवस्थेत जगताना दिसतात. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा विचार केला, तर त्या त्या भागातील भौगोलिक, राजकीय आणि सामाजिक

Scanned by CamScanner

परिस्थितीनुसार आदिवासींचे विशेषतः पारधी आदिवासींचे प्रश्न बदलत गेले आहेत. परंतु सद्यस्थितीत आदिवासी स्त्री जगण्याच्या जीवघेण्या संघर्षात भरडून निघालेली आहे. तिचे जगणे असंख्य विरोधाभासानी भरलेले आहे.

गुन्हेगार जमाती कायदा अंतर्गत गुन्हेगारीचा काळा शिक्का बसलेला हा पारधी समाज आजही पोलिसांच्या नजरे समोर गुन्हेगार म्हणून दिसून येत आहे. या जमातीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही, तसेच या जमातीतील महिला देखील गुन्हेगारीच्या स्वरूपातूनच इतर समाजातील लोक पाहत असतात. आजही वेगवेगळया गावगाडयात पारधी जमातीचे लोक जवळ येवून पाहत आहेत परंतु उच्चभ्रु लोक त्यांना स्विकारू शकत नाहीत, किंवा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेला नसून आजही या जमातीतील लोकांना तसेच महिलांना देखील चोर अथवा गुन्हेगार जमातीचे लोक असेच मानल्या जाते. म्हणून लोकांना या जमातील महिलांना पुर्णपणे नाकारलेलेच दिसून येते. दिसायला सुंदर असल्यास टवाळखोरांच्या वाकड्या नजरा तिच्यावर पडतात. भटकंती, कमी वयात विवाह आणि दरिद्र्यामुळे तिला शिक्षण घेता येत नाही.पतीला जास्त दिवसांचा कारावास झाल्यास अथवा तो बेपत्ता झाल्यास वडिल तिचा दुसरा विवाह करुन देतो. तिथेही तिला मुले होतात. त्यामुळे पतीची वासनापुर्ती करणे, अनेक मुलांना जन्म देणे, जुणे कपडे मागणे, भीक मागणे आणि शेवटी मरणे हेच तिचे जीवनचक्र झाले आहे. एकूणच तह हयात तिला संघर्ष करावा लागतो. नवऱ्याच्या गुन्ह्यासाठी अथवा गुन्हा नसतांना देखील पोलिसांचा अत्याचार सहन करावा लागतो.

अशा अनेक समस्या आहेत की, ज्यामुळे पारधी स्त्रियांचे स्त्रित्व हरपलेले दिसून येते. म्हणून समग्र समाजातून पारधी जमातीच्या स्त्रियांसमोर असलेले निर्बंध कमी करून मुक्तपणे संचार करण्याची संधी देणे व स्त्री सक्षमीकरणाच्या माध्यमातून त्यांचा विकास घडवून आणणे गरजेचे आहे, असे या समाजाच्या अभ्यासावरून लक्षात येते.

**पारधी जमातीच्या स्त्रियांपुढील आव्हाने :**

भारतीय समाजव्यवस्थेत आज २१ व्या शतकात देखील स्त्रियांना दुय्यमच स्थान दिल्या जात आहे. पारंपारिक मानसिकता बदललेली दिसून येत नाही. कोणत्याही समाजात स्त्रियांसाठी समानता दिसून येत नाही. विकसित आणि विकासाच्या परिघाच्या बाहेर असलेल्या जाती-जमाती मध्ये देखील स्त्रियांना पाहिजे तसे कुटुंबातील लोक तथा समाजातील पुरूष स्थान देत नाहीत, कारण की, आजही स्त्रियांकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला दिसून येत नाही. म्हणून पारधी समाज असो अथवा कोणत्याही जमातीत स्त्रियांना सतत अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असते. तसेच पारधी जमातीच्या स्त्रियांना देखील आज ही वेगवेगळया आव्हानाला तोंड द्यावे लागत असल्याचे दिसून येते. पारधी जमातीच्या स्त्रियांपुढे आव्हाने आहेत. त्या स्त्रिया दैनंदिन जीवनात संघर्षमय जीवन जगत असतात आणि प्रत्येक वेळी त्या स्त्रिया संघर्षातून पुढे जाण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.

१. पारधी समाजातील स्त्रियांकडे उच्चभ्रु जातींच्या लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलेला दिसून येत नाही, कारण की, लोक त्यांना आजही चोरी करण्याऱ्या जमातीच्या महिला या अर्थानेच पाहत असतात.
२. पारधी जमातीतील लोक देखील स्त्रियांना बरोबरीचे स्थान देत नसून स्त्री ही कुटुंबाच्या चौकटीच राहावी, अशी पुरूषांची मानसिकता असल्याचे दिसून येते.
३. पारधी जमातीच्या स्त्रियांचे इतर समाजातून सामाजिक शोषण केल्या जाते, तसेच गावगाडयात त्यांना कोणत्याही कार्यात सहभागी करून घेतले जात नाहीत.
४. गुन्हेगार जमातीच्या स्त्रिया या अर्थानेच गावगाडयातील लोंकांचा पाहण्याचा कल असतो. त्यामुळे स्त्रियांना सामाजिक शोषणाला बळी पडावे लागते. सामाजिक बहिष्काराची प्रक्रिया अनेक ठिकाणी वेगवेगळया कार्यक्रमाच्या माध्यमातून इतर समाजात दिसून येते.
५. शैक्षणिकदृष्टया मागासलेपणा असल्यामुळे पारधी समाजातील महिला सक्षमपणे उभी राहू शकत नाही, त्या करीता त्यांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागते.
६. राजकीयदृष्टया आरक्षणाच्या आधारे संधी मिळाल्या नंतर देखील प्रत्यक्ष काम करण्याची संधी मात्र दिली जात नाही, उलट या महिलांच्या आवाज दाबल्या जाते. कौटुंबिक शोषणातून मुक्त होण्यासाठी व्यसनाधिनतेचे



Scanned by CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Issue 30 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Jan. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

प्रमाण कमी करण्यासाठी त्या महिला प्रयत्न करीत असेल तर त्यांना त्या समाजातूनच विरोध होतो, व त्यांना कुटुंबातच शोषणाला बळी पडावे लागते.

७. शासन व सरकारच्या माध्यमातून या महिलांचे पुर्नःउत्थान करण्यासाठी कठोर कायदे करून परिवर्तन घडवून आण्यासाठी अमलबजावणी होणे गरजेचे आहे. परंतु तसे पाहावयास मिळत नाही.

अशा प्रकारे पारधी आदिवासी जमातीच्या समोर असलेले अनेक आव्हान दिसून येतात. या सर्व आव्हानाला या महिला लढत आलेल्या आहेत. म्हणून याचे निर्मूलन होणे गरजेचे आहे.

**उपाय :**

पारधी आदिवासी स्त्रियांच्या समग्र विकासाठी प्रथमतः त्यांच्या समोरील आव्हाने कोणती आहेत, समजून घेवून त्याचे निर्मूलन होणे गरजेचे आहे. तसेच सर्व स्तरातून पारधी आदिवासी स्त्रियांच्या समग्र परिवर्तनासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे दिसून येते.

१. पारधी जमातीच्या स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. त्यांना चोर न समजता इतर समाजात एकरूप करून घेणे, समानतेची वागणूक देणे, भेदभाव कमी करणे.

२. जमातीतील लोकांनी देखील आपल्या स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल करणे व स्वाभिमानाने जगण्याची संधी त्या ही स्त्रियांना बहाल करणे गरजेचे आहे.

३. सामाजिक शोषणाची प्रक्रिया थांबवून त्यांना शोषणमुक्त करणे तसेच सामाजिक बहिष्कारापासून अलिप्त ठेवणे महत्वाचे आहे.

४. शिक्षणाच्या बाबतीत विषमता असल्यामुळे स्त्रियांना शिक्षणासाठी संधी दिली जात नाही, तसेच समाज मनातून तसे सहकार्य देखील स्त्रियांना केले जात नाही. स्त्रियांच्या शिक्षणामुळे समाज विकसित होत असेल तर निश्चितच शिक्षण देणे गरजेचे आहे.

५. राजकीय क्षेत्रात पंचायतराज मधील कोणत्याही स्तरात त्या जमातीतील स्त्रियांना संधी मिळालेली असते, परंतु उच्चभ्रु जातीच्या लोकांकडून त्यांना प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जात नाही, यामध्ये बदल होणे गरजेचे आहे, त्यांना त्या त्या पदावर कार्यभार सांभाळण्याची संधी देणे तसेच त्यांना देखील सहकार्य करणे गरजेचे आहे, असेच प्रत्यक्ष कायद्याची अमलबजावणी करून या जमातीच्या स्त्रियांना न्याय देणे आवश्यक आहे.

६. व्यसनाधिनतेपासून समाजाला अलिप्त करण्यासाठी तसेच समाजातील कुप्रथा नष्ट करण्यासाठी समाजातून प्रयत्न करणे आणि शासनाच्या माध्यमातून कायद्याची काटेकोरपणे अमलबजावणी करून समाजामध्ये परितर्वन घडवून आणणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

भारतात आणि वेगवेगळया राज्यात ज्या पध्दतीने पुरुष ज्या हक्क, अधिकार, स्वातंत्र्य आणि संधींचा उपभोग घेतात, त्या वैशिष्ट्यापासून आजही स्त्रियांना वंचित ठेवण्याचे सतत प्रयत्न केले जाते. आदिवासी पारधी जमातीमध्ये जे वेगवेगळे धार्मिक विधी, संस्कार होतात. त्यामध्ये स्त्रियांना कोणतेच स्थान नाही. तसेच जात पंचायतीमध्ये बहुतांशपणे स्त्रीलाच निरपराधित्व सिध्द करावे लागते. या जमातीमध्ये पतीने पत्नीला मारहाण करण्यास एकप्रकारे मान्यताच दिली आहे. मासिक पाळीमध्ये स्त्रीला अपवित्र मानले जाते. मुलगा वडिलांच्या पाया पडतो आईच्या नाही. जन्मदात्या आईला गौण स्थान दिले जाते. तिच्या कपड्याला जरी पुरुषाचा स्पर्श झाला तरी तिलाच बहिष्कृत केले जाते.

अशाप्रकारे इतर अनुसूचित जमातींमध्ये असे नसले तरी ते पारधी जमातीमध्ये प्रकर्षाने जाणवते. या विषमतेमुळे पारधी स्त्रीवर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होतात. हक्क, अधिकार आणि संधी नाकारल्या जातात. पारधी जमातीची एकुणच स्थिती वाईट असून त्यातही पारधी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामते कोणत्याही समाजाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करावे लागते. पारधी स्त्रीवर लक्ष केंद्रित केल्यास त्यांच्या जीवन स्थितीमध्ये फारसा बदल झाला असल्याचे दिसून येत नाही. म्हणून पारधी समाजाच्या समस्या सोडवितांना पारधी स्त्रियांच्या समस्यांवर लक्ष

Scanned by CamScanner

केंद्रित करावे लागते. तेव्हाच पारधी जमात विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकेल. पारधी स्त्रियांना समस्या पासून मुक्त करणे, समकालीन आव्हाने समूळ नष्ट करणे, तेव्हाच या समाजाची प्रगती होऊ शकेल, असे या अभ्यासावरून स्पष्टपणे मांडता येईल.

संदर्भ :

१. चव्हाण दिलीप (२००७), स्त्री शिक्षणाचा संघर्ष, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी मंच, पुणे.
२. भोसले नारायण, (२००८), भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत-परंपरा आणि संघर्ष, द ताईची प्रकाशन, पुणे.
३. चव्हाण रामनाथ (२००८), भटक्या विमुक्तांची जात पंचायत, देशमुख आणि कं. पब्लीशर्स, पुणे.
४. जाधव रमेश (२००३), भटक्या विमुक्तांचे परिप्रक्ष, हरनाई प्रकाशन, नांदेड.
५. पवार दिपक (२०१४), पारधी समाजाचे अंतरंग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
६. कुमार एम. (२००६), आदिवासी संस्कृति एवं राजनिति, विश्वभारती पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
७. राठोड गणपत (२०१५), घुमन्तु जनजातियों का सांस्कृतिक अध्ययन, पुजा पब्लिकेशन, कानपुर.
८. फुलवाडकर दिनानाथ, (२००६), बोलियाँ एवं बोली कोश, समता प्रकाशन, कानपुर.
९. चव्हाण रामनाथ, (१९९०), जाती आणि जमाती, मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे.
१०. गारे गोविंद, (२०१२), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
११. आगलावे प्रदिप (२०१२), सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.



Scanned by CamScanner